# परिपत्रक

क्रं. नों.म.नि.४/ १६३८/३३ ते ३८२
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय, पुणे -१.
दिनांक २५ जानेवारी १९८८.

**विषय :- छापील दस्तऐवजाच्या नोंदणी बाबत.**

महाराष्ट्र नोंदणी आदेश संहिता भाग २ यात दुरुस्ती करुन आदेश क्रं. २३४ (IV) नवीन दाखल करण्यात आला आहे. सदरहू आदेशाची अंमलबजावणी ताबडतोब करावयाची आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. नोंदणीसाठी हजर करण्यात येणाऱ्या छापील दस्तऐवजासोबत सध्या जी कोरी प्रत घेण्यात येते त्या ऐवजी पक्षकारांनी छापील दस्तातील कोऱ्या जागा भरुन नक्कल करुन आणावी. मात्र त्यावर दस्त निष्पादकाच्या किंवा साक्षीदाराच्या मूळ सहया नसाव्यात.

२. मूळ दस्तावरील मुद्रांक विक्रीचे व इतर शेरे याची प्रतिलिपी दुय्यम निबंधकांनी अथवा लिपीक यांनी करावयाची आहे.

३. छापील दस्तासोबत दाखल केलेल्या प्रतीची काळजीपूर्वक पडताळणी करावी.

४. छापील दस्तऐवजांच्या प्रती या प्रमाणित आकाराच्या (Standard Size) असाव्यात.

५. सदरच्या प्रती सुवाच्य असल्या पाहिजेत. सदरहू दस्तऐवजाबाबतची इतर कार्यपध्दती आदेश क्रं. ३३४(३) प्रमाणे राहील. मात्र सदरचे दस्तऐवज अग्रक्रमाने नोंदवू नयेत.

का. प्र. नों.म.नि. यांच्या
सहीची असे.

सही/xxxxx

(दि. या. कुलकर्णी )
कार्यासन अधिकारी क्रं.४ व सहाय्यक
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

प्रत -

१. सर्व सह जिल्हा निबंधक यांना दुय्यम निबंधक यांच्या जादा प्रतींसह अग्रेषित.

२. व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे.

३. दुय्यम निबंधक मुंबई/ बांद्रा यांना अग्रेषित.